# प्रकरण ५ वे

# " संशोधन सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन"

## प्रकरण ५ वे

### संशोधन सामग्रीचे विश्लेक्षण व अर्थनिर्वचन.

५.१ प्रास्ताविक.

५.२ प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची शैक्षणिक पात्रता.

५.३ प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचा मराठी अध्यापनाचा एकूण अनुभव .

५.४ प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचा मराठी अध्यापनाचा एकूण अनुभव.

५.५ पाठ्यपुस्तकांतून प्रनिबिंबित होणारी गाभामूल्ये.

५.६ विविध यत्तांच्या पाठ्यपुस्तकांतून प्रनिबिंबित होणाऱ्या १० गाभाभूत घटकांचे प्रमाण.

५.७ प्रस्तुत संशोधनाला उपयुक्त ठरणारी अन्य माहिती.

५.८ समारोप.

## ५ :१ प्रस्ताविका :

मागील प्रकरणात म्हणजे प्रकरण क्रं. ४ मध्ये आपण संशोधन म्हणजे काय ? संशोधनाचे महत्व पद्धती याविषयी त्याचप्रमाणे नमुना निवड, प्रश्नावली व मुलाखातीचे विश्लेषण म्हणजेच संशोधनाच्या कार्यपद्धतीविषयी माहिती मिळविली.

प्रस्तुत प्रकरणामध्ये संयोधिकेने स्वत: केलेल्या बालभारती पाठ्यपुस्तकातील पाठामधून१० गाभाभूत घटकांच्या दृष्टिकोनातून क ेलेल्या विश्लेषणाची यथार्थता पडताळून पाहण्यासाठी हा विषय शिकविणाऱ्या शिक्षकांच्यासाठी एक प्रश्नावली तयार के ली होती या

प्रश्नावीचा उहापोह प्रकरण चार मध्ये केलेला आहे ही प्रश्नावली परिशिष्ट "अ" मध्ये दिलेली आहे. ही प्रश्नावली २० शिक्षकांकडून भरून घेण्यात आली (पहा परिशिष्ट - अ)

प्रस्तुत प्रकरणात प्रश्नावलीची यथार्थता व विश्वसनीयता प्रस्थापित करण्याच्या दृष्टिने मुलाखती घेतल्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची तयार करण्यात आली (पहा परिशिष्ट -ब) संशोधिकेने एकूण १० शिक्षकांच्या मुलाखती घेतल्या ( पहा परिशिष्ट - ड)

प्रश्नावलीतील आणि मुलाखतीतील प्रश्नांना दिलेल्या प्रतिसादांचे संकलन, संपादन, सारणीकरण आणि अर्थनिर्वचन प्रस्तुत प्रकरणात क ेले आहे.

## ५ :२ प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची शैक्षणिक पात्रता.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रं. २ प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची शैक्षणिक पात्रता जाणून घेण्यासाठी विचारण्यात आला होता. या प्रश्नाला मिळालेल्या प्रतिसादांचे पुढील सारणीमध्ये नोंद करण्यात आली आहे.

सारणी क्रमांक ५ :१

प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची शैक्षणिक पात्रता.

| अ.न. | शैक्षणिक पात्रता | शिक्षक संख्या | वारंवारिता |
|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी.डी.एड. | ११ | ११ |
| २ | एच.एस.सी.,डी.एड. | ०३ | ०३ |
| ३ | बी.ए.,डी.एड. | ०३ | ०२ |
| ४ | बी.ए.,बी.पी.एड. | ०१ | ०१ |
| ५ | एम्.ए.,बी.एड. | ०२ | ०२ |
| | एकूण | २० | २० |

विवेचन :

उपरोक्त सारणीवरून असे लक्षात येते की प्रश्नावलीस प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची शैक्षणिक पात्रता S.S.C.,D.Ed ते M.A.,B.Ed. पर्यंत आहे. याचाच अर्थ असा की बहुतांशी सर्व प्रकारची शैक्षणिक पात्रता असलेल्या शिक्षकांनी प्रश्नावलीस प्रतिसाद दिलेला आहे. प्रतिसाद देणाऱ्यामध्ये S.S.C.,D.Ed ही किमान शैक्षणिक अर्हता होती.

## ५.३ प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांच्या अध्यापनाचा एकूण अनुभव.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र मांक ४ व ५ प्रश्नावनांना प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांच्या अनुक्रमे अध्यापनाचा एकूण अनुभव अणिमराठीर विषय शिकविण्याचा अनुभव जाणून घेण्यसाठी विचाराला होता. या दोनही प्रश्नाला निळालेल्या प्रतिसादाचे वारंवरीता सारणीमध्ये रुपांतर करण्यात आले. सारणी क्रमाक ५.२ मध्ये प्रश्नावलीला प्रतिसाद रेणाऱ्या शिक्षकांच्या अध्यापनाचा एकूण अनुभव नोंदविलेला आहे. तर सारणीक्रमांक ५.३ मध्ये या शिक्षकांचा मराठी विषय शिकविण्याचा अनुभव नोंदविला आहे.

## सारणी क्रमांक ५.२

प्रश्नावलीला प्रनिसाद देणाऱ्या शिक्षकांच्या अध्यापनाचा एकूण अनुभव

| अ.न. | अनुभव वर्षे | प्रतिसादकस संख्या | प्रतिसाद श. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ० ते ५ | ४ | २० |
| २ | ६ ते १० | ५ | २५ |
| ३ | ११ ते १५ | १ | ०५ |
| ४ | १६ ते २० | - | - |
| ५ | २१ ते २५ | ४ | २० |
| ६ | २६ ते ३० | ४ | २० |
| ७ | ३१ ते ३५ | २ | १० |
| एकूण | | २० | १०० |

उपरोक्त सारणीवरुन (सारणी क्र. ५.२ प्रश्नावलीला प्रनिसाद देणाऱ्या अध्यापकांच्या अध्यापनाचा एकूण अनुभव ) असे निदर्शनास येते की प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचा अध्यापन अनुभव ५ वर्षा पासून ३५ वर्षापर्यंत इतका प्रदीर्घ आहे.

दिलेल्या वारंवारीतेकरुन पुढील प्रमाणे 'मध्यमान' काढल्यास ते '१६' येते. याचाच अर्थ असा की प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या

अध्यापकांचा सरासरी अनुभव १६ वर्षे इतका प्रदीर्घ आहे.

| अ.नं | वय वर्षे | वारंवारीता | Gx | fx | |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३१-३५ | २ | ३ | ६ | |
| २ | २६-३० | ४ | २ | ८ | |
| ३ | २१-२५ | ४ | १ | ४ | |
| ४ | १६-२० | - | ० | ० | ---- |
| ५ | ११-१५ | १ | १ | -१ | १८ |
| ६ | ६-१० | ५ | २ | -१० | ---- |
| ७ ०-५ | ३ | ३ | -०९ | -२० | |

$$TM = A.M. \pm c \times i$$

$$= 18 - 2/20 \times 5/1$$

$$= 18 - 2$$

$$= 16$$

मध्यमान = १६

सारणी क्र.५ : ३

५ : ३ प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचा

मराठी अध्यापनाचा एकूण अनुभव.

| अ.न | मराठी अध्यापन अनूभव वर्षे | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे.प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ०-५ | ७ | ३५ |
| २ | ६-१० | ६ | ३० |
| ३ | ११-१५ | - | - |
| ४ | १६-२० | - | - |
| ५ | २१-२५ | ४ | २० |
| ६ | २६-३० | २ | १० |
| ७ | ३१-३५ | १ | ०५ |
| | एकूण | २० | १०० |

उपरोक्त सारणीवरून (सारणी क्रं. ६ . ३ प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या अध्यापकांच्या मराठी अध्यापनाचा एकूण अनुभव ) असे निदर्शनास येते की प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचा मराठी अध्यापन अनुभव ५ वर्षापासून ३५ वर्षापर्यंत इतका प्रदीर्घ आहे.

दिलेल्या वारंवारीतेवरून पुढील प्रमाणे मध्यमान काढल्यास ते '१२' येते याचाच अर्थ असा की प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या अध्यापकांचा सरासरी मराठी अध्यापनाचा अनुभव '१२' वर्षे इतका प्रदीर्घ आहे.

## ५.४ प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचा मराठी अध्यापनाचा एकूण अनुभव

| अ.न. | मराठी अध्यापन अनुभव वर्षे | प्रतिसाद संख्या f | विचलन x | गुणाकार fx | |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३१-३५ | १ | +३ | ३ | |
| २ | २६-३० | २ | +२ | ४ | |
| ३ | २१-२५ | ४ | +१ | ४ | |
| ४ | १६-२० | - | - | ० | +११ |
| ५ | ११-१५ | - | -१ | ० | |
| ६ | ६-१० | ६ | -२ | -१२ | |
| ७ | ०-५ | ७ | -३ | -२१ | |
| | | एकूण | | -३३ | |

A.M. = 17.5

T.M. = A.M. ± c x i

= 17.5 - 22 / 20 x 5

$= 17.5 - 5.5$

$= 12$

मध्यमान = १२

५.५ - विविध यत्तांच्या पाठ्यपुस्तकांतून प्रतिबिंबित होण्याऱ्या १० गाभाभूत घटकांचे प्रमाण :

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक क्रमांक ६ प्रश्नावलीसोबत पाठांची नावे व त्यापुढे त्यातून प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये दिलेली आहेत दिलेल्या गाभामूल्याव्यतिरिक्त आणखी काही गाभामूल्ये प्रतिबिंबित होत असतील तर ती त्या त्या पाठापुढे लिहावीत. हा प्रश्न मुक्त स्वरुपाचा होता. हा प्रश्न विचारण्याचा हेतू असा होता. हाप्रश्न विचारण्याचा हेतू असा होता की पाठ्यपुस्तकतील पाठांमधून दिलेल्या गाभामूल्याव्यतिरिक्त आणखीन काही गाभामूल्ये प्रतिबिंबित होत असतील तर ती प्रतिसादक शिक्षकांच्याकडून, जाणून घ्यावीत. त्यानुसार २० पैकी १८ अध्यापकांनी प्रतिसाद नोंदविला आहे. प्रतिसादक शिक्षकांनी सुचविलेल्या गाभामूल्यांची नोंद घेऊन खालील सारणी तयार केलेल्या आहेत. (सारणी क्रमांक ५.४, ५.५, ५.६, ५.७)

सारणी क्र. ५.४

इयत्ता १ ली च्या बालभाती पाठ्यपुस्ताकतील पाठामधून प्रतिबिंबित होणारि गाभामूल्ये.

| अ.न. | पाठ क्र | पाठाचे नाव | प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये |
|---|---|---|---|
| १ | १-अ. | चांदोबा पाण्यात पडला | १. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| | (चित्रनिरीक्षण) | | २. पर्यावरण संरक्षण |
| २. | गाणे | मोरा रे मोरा | १. पर्यावरण संरक्षण |
| | | | २. राष्ट्रीय अस्मिता जोपासणे. |
| ३. | चित्रनिरीक्षण | एकीचे बळ | १. सामाजिक अडसरांचे निर्मुलन |
| | | | २. भारतीय संविधानात्मक जबाबदरी |
| | | | ३. सर्वधर्मसमभाव |
| ४. | गाणे | भिंगरी | १. वैज्ञानिक मनोभावची रुजणूक. |
| ५. | चित्रनिरीक्षण | कोल्हा व द्राक्षे | १. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| | | | २. पर्यावरण संरक्षण. |
| ६. | गाणे | झू झू झोपाळा | १. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| ७. | चित्रनिरीक्षण | मायाळू हत्ती | १. पर्यावरण संरक्षण. |
| | | | २. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| | | | ३. भारतीय संविधानात्मक जबाबदरी |
| ८. | १ | आ घ ई र | १. पर्यावरण संरक्षण. |
| | | | २. लहाण कुटुंबाचा आदर्श |
| | | | ३. स्त्री-पुरुष समानता |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | २ | प ण फ स | १. पर्यावरण संरक्षण.<br>२. लहाण कुटुंबाचा आदर्श<br>३. स्त्री-पुरुष समानता |
| १० | ३ | अ न ऊ | १. पर्यावरण संरक्षण.<br>२. लहाण कुटुंबाचा आदर्श<br>३. स्त्री-पुरुष समानता |
| ११ | ४ | म त क ब | १. भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा<br>२. लहान कुटुंबाचा आदर्श |
| १२. | ५ | ग द व ा | १. पर्यावरण संरक्षण<br>२. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| १३. | ६ | उ ऐ औ ळ ख | १. भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा<br>२. भारतीय संविधानात्मक जबाबदारी<br>३. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| १४. | ७ | झ ड ओ ी | १. स्त्रि-पुरुष समानता<br>२.भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| १५. | ८ | य ज ड ए | १. पर्यावरण संरक्षण<br>२. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | ९ | ल श ह अं ि | १.भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| | | | २. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| १७ | १० | इ ट ठ छ | १. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| १८ | ११ | थ ष ध च भ ृ ो | १ पर्यावरण संरक्षण |
| | | | २. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| १९ | १२ | मूळाक्षरे | --- |
| २० | १३ | माझा हात | १. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| | | | २.भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| २१ | १४ | ताजी भाजी | १. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| | | | २. सामाजिक अडसरांचे निर्मुलन |
| | | | ३. स्त्री-पुरुष समानता |
| २२ | १५ | फुगा फुटला | १ पर्यावरण संरक्षण |
| | | | २. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| २३ | १६ | माझा देश | १. राष्ट्रीय अस्मिता जोपासणे |
| | | | २ पर्यावरण संरक्षण |
| | | | ३. स्त्री-पुरुष समानता |
| | | | ४. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| २४ | १७ | खेळ पळापळीचा | १. स्त्री-पुरुष समानता |
| | | | २.भारतीय संविधानात्मक जबाबदारी |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | १८ | बोला बाई बोला | १. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| २६ | १९ | वाढदिवस | १. धर्मनिरपेक्षता |
| | | | २. स्त्री-पुरुष समानता |
| २७ | २० | गंमत जंमत | १. स्त्री-पुरुष समानता |
| | | | २. भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा |
| २८ | २१ | मोत्याची शेपटी | १. पर्यावरण संरक्षण |
| | | | २. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| २९ | २२ | चला सुट्टी झाली | १. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| ३० | २३ | माझी शाळा | १. स्त्री-पुरुष समानता |
| | | | २. पर्यावरण संरक्षण |
| | | | ३. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| ३१ | २४ | एक होता गणू | १. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| ३२ | २५ | फुलपाखरु | १.पर्यावरण संरक्षण |
| ३३ | २६ | तिळगूळ घ्या गोड बोला | १. सर्वधर्मसमभाव |
| | | | २. भारताचा सामाईक वारसा |
| ३४ | २७ | एक होता ससा | १. पर्यावरण संरक्षण |
| ३५ | २८ | आनंदाने गाऊ या | १. पर्यावरण संरक्षण |
| ३६ | २९ | रुप नको गुण पाहा | १. पर्यावरण संरक्षण |
| | | | २. राष्ट्रीय अस्मिता जोपासणे. |

सारणी क्रमांक ५.५

इयत्ता २ री च्या बालभारती पाठ्यपुस्तकातील पाठामधून प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये

| अ.न. | पाठ क्र | पाठाचे नाव | प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये |
|---|---|---|---|
| १ | १ | झोपाळा गेला उडून | १. पर्यावरण संरक्षण |
| | | | २.वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| २. | २ | लोभी कुत्रा | १. भारताचा समाईक सांस्कृतिक वारसा |
| | | | २. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| | | | ३. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| ३. | ३ | कोणाचे ग कोणाचे ? | १. पर्यावरण संरक्षण |
| | | | २. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| ४ | ४ | माकडे आणि टोपीवाला | १. पर्यावरण संरक्षण |
| | | | २. सामाजिक अडसरांचे निर्मूलन. |
| ५. | ५ | आमची मंजू | १. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| | | | २. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| | | | ३. स्त्री-पुरुष समानता |
| | | | ४. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| ६ | ६ | भूर जाऊ | १. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| | | | २. पर्यावरण संरक्षण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ३. लहान कुटुंबाचा आदर्श |
| ७ | ७ | उठा उठा चिऊ ताई | १. पर्यावरण संरक्षण |
| | | | २. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| ८ | ८ | असा पडतो पाऊ स | १. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| | | | २. पर्यावरण संरक्षण |
| | | | ३. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| ९ | ९ | माझे घर | १. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| | | | २. पर्यावरण संरक्षण |
| | | | ३. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| १० | १० | ये रे ये रे कोल्होबा | १. पर्यावरण संरक्षण |
| | | | २. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| | | | ३. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| ११ | ११ | नदीचे गाणे | १. पर्यावरण संरक्षण |
| | | | २. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| | | | ३. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| | | | ४. समानतावाद |
| १२ | १२ | देतो तो देव | १. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| | | | २. पर्यावरण संरक्षण |
| | | | ३.वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | १३ | माकडाचे दुकान | १. पर्यावरण संरक्षण |
| | | | २. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| | | | ३. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| १४ | १४ | घरचे डॉक्टर | १. पर्यावरण संरक्षण |
| | | | २. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| १५ | १५ | पतंग | १. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| | | | २. पर्यावरण संरक्षण |
| | | | ३. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| १६ | १६ | सहल | १. पर्यावरण संरक्षण |
| | | | २. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| | | | ३. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| १७ | १७ | वाहनांची मजा | १. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| | | | २. पर्यावरण संरक्षण |
| १८ | १८ | एवढीशी चूक | १. राष्ट्रीय अस्मिता जोपासणे |
| | | | २. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| | | | ३. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| १९ | १९ | धाडसी शिवशंकर | १. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| | | | २. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | २० | मी कोण ? | १. भारतीय सामाजिक सांस्कृतिक वारसा |
| २१ | २१ | रवी शहाणा झाला | १. पर्यावरण संरक्षण<br>२. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| २२ | २२ | मुंग्याचा विजय | १. भारतीय संविधानात्मक जबाबदारी<br>२. पर्यावरण संरक्षण<br>३. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक<br>४. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| २३ | २३ | पत्राचा प्रवास | १.पर्यावरण संरक्षण<br>२.वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक<br>३. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| २४ | २४ | अक्कू बक्कू | १.पर्यावरण संरक्षण<br>२.वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक<br>३. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |

सारणी क्र. ५.६

इयत्ता ३ री च्या बालभारती पाठ्यपुस्तकातील पाठामधून प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये

| अ.न. | पाठ क्र | पाठाचे नाव | प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये |
|---|---|---|---|
| १ | गाणे १ | जय भारता | १. राष्ट्रीय अस्मिता जोपासणे<br>२. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास<br>३. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| २ | गाणे २ | या बालांनो, या रे या ! | १. पर्यावरण संरक्षण |
| ३ | गाणे ३ | झाडे लावू | १. पर्यावरण संरक्षण<br>२.वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक<br>३. स्त्री-पुरुष समानता |
| ४ | गाणे ४ | छोटेसे बहीणभाऊ | १. पर्यावरण संरक्षण<br>२. समानतावाद<br>३. लहान कुटुंबाचा आदर्श |
| ५ | १ | जिकडे तिकडे पाणीच पाणी | १. पर्यावरण संरक्षण<br>२.वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| ६ | २ | सवय शिस्तीची | १. राष्ट्रीय अस्मिता जोपासणे<br>२. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | ३ | निश्चयाचे बळ | १. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास<br>२. भारताचा सामाईक संस्कृतिक वारसा |
| ८ | ४ | गाणे आमुचे जुळे | १. पर्यावरण संरक्षण<br>२. समानतावाद |
| ९ | ५ | शिरीषकुमार | १. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास<br>२. भारतीय संविधानात्मक जबाबदारी<br>३. स्त्री-पुरुष समानता<br>४. राष्ट्रीय अस्मिता जोपासणे |
| १० | ६ | चगिया | १. पर्यावरण संरक्षण<br>२. भारतीय संविधानात्मक जबाबदारी<br>३. समानतावाद |
| ११. | ७ | ज्योत | १. वैज्ञानिक दृष्टिकोन<br>२. भारताचा समाईक सांस्कृतिक वारसा |
| १२. | ८ | चित्रे | १. लहान कुटुंबाचा आदर्श |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | २. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| १३. | ९ | अशी असावी मैत्री | १. पर्यावरण संरक्षण<br>२. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| १४. | १० | प्रात:काल | १. पर्यावरण संरक्षण<br>२. भारतीय संविधानात्मक जबाबदारी<br>३.भारताचा सामाईक सांास्कृतिक वारसा. |
| १५. | ११ | कंधारची सहल | १. धर्मनिरपेक्षता<br>२. भारतीय संविधानात्मक जबाबदारी<br>३. राष्ट्रीय अस्मिता जोपासणे<br>४. भारताचा सामाईक संस्कृतिक वारसा |
| १६ | १२ | मी क्रिकेट खेळतो | १. भारतीय संविधानात्मक जबाबदारी<br>२. धर्मनिरपेक्षता<br>३. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | १३ | लेखन कसे असावे | १. सामाईक सांस्कृतिक वारसा |
| १८ | १४ | डोंगरदादा | १. पर्यावरण संरक्षण |
| | | | २. भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्या |
| १९ | १५ | शाबास माझ्या पुता ! | १. भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्या |
| | | | २. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| २० | १६ | चालता चालता काय होते | १. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| २१ | १७ | फुलांची भेट | १. पर्यावरणाचे संरक्षण |
| | | | २. संविधानात्मक जबाबदारी. |
| | | | ३. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| २२ | १८ | राजू आरशात पहातो | १. पर्यावरणाचे संरक्षण |
| | | | ३. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| २३ | १९ | मला व्हायचय अंतराळवीर | १.वैज्ञानिक दृष्टिकोन |
| २४ | २० | धावपटू भाग्यश्री बिले | १. स्त्री पुरुष समानता |
| | | | १. भारतीय संविधानात्मक जबाबदरी |
| २५ | २१ | तेनालिराम | १. सामाईक सांस्कृतिक वारसा |
| २६ | २२ | मी आहे दूरदर्शन | १. वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | | २. समानतावाद |
| | | | ३. सामजिक अडसरांचे निर्मूलन |

सारणी क्र. ८ / ५.७

इयत्ता ४ थी च्या बालभारती पाठ्यपुस्तकातील पाठामधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये

| अ.न. | पाठ क्र. | पाठाचे नाव | प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये |
|---|---|---|---|
| १ | १ | झूळक मी व्हावे (कविता) | १. पर्यावरणाचे रक्षण<br>२. समानतावाद<br>३.स्त्री - पुरुष समानाता<br>४. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| २. | २ | साकव | १. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक<br>२. पर्यावरण संरक्षण<br>३. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| ३. | ३ | मला माझ्या आईचा अभिमान वाटतो | १. स्त्री - पुरुष समानाता<br>२. पर्यावरण संरक्षण<br>३. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| ४. | ४ | हिरकणी | १. राष्ट्रीय आस्मिता जोपासणे<br>२. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक<br>३. सामाजिक अडसरांचे निर्मूलन<br>४.भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| ५. | ५ | क्रांतिकारकाचे बालपण | १. भारतीय स्वातंत्र्याचा चळवळीचा इतिहास |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | २. राष्ट्रीय अस्मिता जोपासणे |
| | | | ३. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| ६ | ६ | देवगिरी | १. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| | | | २. राष्ट्रीय अस्मिता जोपासणे |
| ७. | ७ | पोपटपंची | १. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| | | | २. पर्यावरण संरक्षण |
| ८. | ८ | धरत्रीले दंडवत | १. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| | | | २. पर्यावरण संरक्षण |
| ९ | ९ | बलाढ्य मुंगी | १.पर्यावरण संरक्षण |
| | | | २.राष्ट्रीय अस्मिता जोपासणे |
| | | | ३.वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| १० | १० | वीरांगना | १. सवातंत्र्य चळवळीचा इनिहास |
| | | | २. स्त्री पुरुष समानता |
| ११. | ११ | पत्र | १.पर्यावरण संरक्षण |
| | | | २. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| | | | ३.वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| १२. | १२ | हळूच या हो हळूच या! | १.पर्यावरण संरक्षण |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | १३ | डॉ. बाबासाहेब | १. राष्ट्रीय अस्मिता जोपासणे<br>२.भारतीय स्वातंत्र्याचा<br>चळवळीचा इतिहास<br>३. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| १४. | १४ | मुलाचे पाय पाळण्यात दिसतात. | १. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| १५ | १५ | अती तिथ माती | १.भारतीय संविधानात्मक जबाबदारी<br>२. सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| १६. | १६ | सायंकाळची शोभा | १. पर्यावरण संरक्षण<br>२. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक |
| १७ | १७ | गोविंदपूल | १. वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक<br>२. भारतीय संविधानात्मक जबाबदारी<br>३. पर्यावरण संरक्षण |
| १८ | १८ | सुभाषचंद्र बोस | १. भारतीय संविधानात्मक जबाबदारी<br>२. स्त्री पुरुष समानता<br>३. राष्ट्रीय अस्मिता जोपासणे<br>४. स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास |
| १९ | १९ | प्रमाण | १ भारतीय संविधानात्मक जबाबदारी |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | २० | माझ्या आठवणी | १. राष्ट्रीय अस्मिता जोपासणे<br>२. स्त्री पुरुष समानता<br>३. भारतीय संविधानात्मक जबाबदारी |
| २१ | २१ | अभंग | १. राष्ट्रीय अस्मिता जोपासणे<br>२. भारतीय संविधानात्मक जबाबदारी<br>३.भारतीय स्वातंत्र्याचा चळवळीचा इतिहास<br>४. समानतावाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षता |

सारणी क्रमांक ९,५ . ८.

पाठ्यपुस्तकांतील पाठामधून गाभामूल्ये पुरेशा प्रमाणात प्रतिबिंबित होतात की नाहीत याच्या मूल्यमापनाबाबत.

| अ.न | प्रतिसादाचे स्वरूप | प्रकतसादक संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३० | १००% |
| २ | नाही | -- | ---- |
| | एकूण | ३० | १००% |

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ७ - पाठांची नावे व त्यापुढे त्यातून प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये दिलेली आहेत ती जर त्या त्या पाठामधून प्रतिबिंबित होत नसतील तर त्या त्या गाभामूल्याभोवती वर्तुळ काढा. हा प्रश्न विचारण्याचा हेतू हा होता की पाठ्यपुस्तकातील पाठांमधून दिलेली गाभामूल्ये प्रतिबिंबित होतात का ? जर होत नसतील तर त्याचा शोध प्रतिसादक अध्यापकांनी घ्यावा.

प्रतिसादक अध्यापकांच्या प्रतिसादानुसार सर्वच्या सर्व प्रतिसादकांनी त्या त्या पाठामधून सर्व गाभामूल्ये प्रतिबिंबित होतात. असा प्रतिसाद नोंदविला आहे.

५. ६ विविधयत्तांच्या पाठ्यपुस्तकातील होणाऱ्या १० गाभाभूत पुस्तकातून प्रनिबिंबित होणाऱ्या १० गाभाभूत घटकांचे प्रमाण. प्रश्नावलीतील प्रश्न क्र मांक ८ -इयत्ता पहिलीच्या पाठ्यपुस्तकातील पाठामधून गाभामूल्ये पुरेशा प्रमाणात प्रतिबिंबित झाली आहेत का ? हा होता. हा प्रश्न 'होय' किंवा 'नाही' अशा स्वरूपाचा होता. हा प्रश्न विचारण्याचा हेतू असा होता की इयत्ता १ ली च्या पाठ्यपुस्तकातून गाभामूल्ये पूरेशाप्रमाणात प्रतिबिंबित होतात की नाहीत ? याविषयाचे शिक्षकांचे मत जाणून घेणे या प्रश्नाला सर्वच्या सर्व प्रतिसादकांनी होय असा प्रतिसाद दिला याचाच अर्थ असा की प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांच्या मते इयत्ता १ ली च्या पाठ्यपुस्तकांतील पाठामधून गाभामूल्ये पुरेशा प्रमाणात प्रतिबिंबित होतात.

प्रश्न क्रमांक ८ ला सर्वच प्रतिसादकांनी 'होय' असा प्रतिसाद दिल्यामूळे प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ९ व १० या प्रश्नांना प्रतिसाद देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ११ - इयत्ता २ री च्या पाठ्यपुस्तकातील पाठामधून गाभामूल्ये पुरेशाप्रमाणात प्रतिबिंबित झाली आहेत का ? हा होता हा प्रश्न 'होय' कींवा 'नाही' अशा स्वरूपाचा होता. हा प्रश्न विचारण्याचा हेतू असा होता की इयत्ता २ रीच्या पाठ्यपुस्तकांतून गाभामूल्ये

पुरेशाप्रमाणात प्रतिबिंबित होतात की नाहीत ? या विषयीचे शिक्षकांचे मत जाणून घेणे. या प्रश्नाला सर्वच्या सर्व प्रतिसादकांनी 'होय' असा प्रतिसाद नोंदविला याचाच अर्थ असा की सर्व शिक्षक प्रतिसादकांच्या मते इयत्ता २ री च्या पाठ्यपुस्तकातील पाठामंधून गाभामूल्ये पुरेशाप्रमाणात प्रतिबिंबित होतात.

प्रश्नवलीतील प्रश्न क्रं. ११ चे उत्तर 'होय' असे नोदंविले असल्यामुळे प्रश्न क्रं. १२ व १३ या दोन प्रश्नांना प्रतिसाद देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. प्रश्नावलीतील प्रश्न क्रं. १४ - इयत्ता ३ री च्या पाठ्यपुस्तकातील पाठामधून गाभामूल्ये पुरेशाप्रमाणात प्रतिबिंबित झाली आहेत का ? हा होता. हा प्रश्न 'होय' किंवा 'नाही' या स्वरूपाचा होता. हा प्रश्न विचारण्याचा हेतू असा होता की इयत्ता ३ री च्या पाठ्यपुस्तकातून गाभामूल्ये पुरेशाप्रमाणात प्रतिबिंबित होतात की नाहीत या विषयाचे शिक्षकांचे मत जाणून घेणे. या प्रश्नाला सर्वच्या सर्व प्रतिसादकांनी 'होय' असा प्रतिसाद दिला. याचाच अर्थ असा की प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांच्यामते इयत्ता ३ री च्या पाठ्यपुस्तकातील पाठामंधून गाभामूल्ये पुरेशाप्रमाणात प्रतिबिंबित होतात.

प्रश्न क्रमांक १४ ला सर्वच प्रतिसादकांनी 'होय' असा प्रतिसाद दिल्यामूळे प्रश्न क्रमांक १५ आणि १६ या प्रश्नांना प्रतिसाद देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १७ - इयत्ता ४ थी च्या पाठ्यपुस्तकांतून प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये पूरेशाप्रमाणात आहेत का? हा होता. हा प्रश्न होय किंवा नाही अशा स्वरूपाचा होता. हा प्रश्न विचारण्याचा हेतू असा होता की इयत्ता ४ थी च्या पाठ्यपुस्तकांतून गाभामूल्ये पूरेशा प्रमाणात प्रतिबिंबित होतात की नाहीत ? या विषयीचे शिक्षकांचे मत जाणून घेणे. या प्रश्नाला सर्वच्या सर्व प्रतिसादकांनी होय असा प्रतिसाद दिला. याचाच अर्थ असा की प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांच्या मते इयत्ता ४ थी च्या पाठ्यपुस्तकातून पुरेशा प्रमाणात गाभामूल्ये प्रतिबिंबित होतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रं. १७ या प्रश्नाला प्रतिसादकांनी 'होय' असा प्रतिसाद दिलेला आहे. त्यामुळे प्रश्न क्रं. १८ व १९ या प्रश्नांना प्रकतसादकांनी प्रतिसाद देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

## ५ : ७ प्रस्तुत संशोधनाला उपयुक्त होणारी अन्य माहीती.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २० - प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात वर विचारण्यात न आलेल्या तथापि प्रस्तुत संशोधनास उपयुक्त ठरेल अशी काही माहीती द्यावयाची असल्यास ती येथे द्यावी. - हा होता हा प्रश्न मुक्त स्वरूपाचा होता हा प्रश्न विचारण्याचा हेतू असा होता की प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांना प्रश्नावलीत विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तराशिवाय वा संशोधनाला उपयुक्त ठरणारी काही वेगळी माहीती द्यावयाची असल्यास ती त्याना देता यावी.

या प्रश्नाला २० पैकी १७ प्रतिसादकांनी त्यांना संशोधनास उपयुक्त ठरेल अशी काही माहीती त्यांच्याजवळ नाही असा प्रतिसाद नोदंविला एका प्रतिसादकांने अशी सूचविले आहे की - इयत्ता १ ली व दुसरीच्या पाठ्यपुस्तकांत गाभा घटक १- ' भारतीय स्वातंत्र चळवळीचा इतिहास' या गाभामूल्याचा समावेश अधिक हवा होता हा मुद्दा विचारात घेतल्यास इयत्ता १ ली व २ री मुलांचा, वयोगट विचारात घेउन 'पर्यावरण संरक्षण' व 'वैज्ञानिक मनोभावाची रूजवणूक' या मूल्यांवर भर दिलेला आहे. दुसऱ्या एका प्रतिसादकांनी असा प्रतिसाद नोंदविला आहे की - बऱ्याच पाठामध्ये 'पर्यावरण संरक्षण' या गाभामूल्यावर अधिक भर दिला आहे. हा कमी करून 'राष्ट्रीय अस्मिता जोपासणे' यावर अधिक भर देण्यात यावा या प्रतिसादकांच्या मतानूसार पाठ्यपुस्तकामधून पर्यावरण संरक्षण या गाभामूल्यावर भर देण्यात आलेला आहे. हे अगदी बरोबर आहे कारण नवीन शैक्षणिक विचार प्रवाहानुसार 'परिसराभ्यासातून शिक्षण' यावर विशेष भर दिलेला आहे. परंतु पाठ्यपुस्तकामधून इतरही मूल्यांचा विचार करण्यात आलेला आहे हे लक्षात येते.

तिसऱ्या एका प्रतिसादकांनी अशी सूचना केली आहे की काही कवितांतून किंवा पाठातून सर्जनशीलता, सृजनशीलता म्हणजेच नवनिर्मिती व सौंदर्याचा विकास हे मूलभूत घटक किंवा उपघटक असू शकतात. तेंव्हा पाठामधून त्यांचाही समावेश यावा. तसेच या शिक्षकाच्या मते 'सामाजिक अडसरांचे निर्मूलन ' या मूलभूत गाभा घटकाचा विचार करता त्याच्या उपघटकामध्ये 'बंधुभाव' हा उपघटक म्हणून समाविष्ट करावा .तसेच लहान कुटुंबाचा आदर्श या मूलभूत गाभाघटकाच्या उपघटकात ममता, जिव्हाळा, दया, परोपकार या उपघटकांचा समावेश करण्यात यावा या प्रतिसादकाने केलेली ही सूचना विचारहार्य आहे.

## ५ : ८ समारोप -

प्रस्तुत प्रकरणात या संशोधनासाठी प्रश्नावलीच्याद्वारे उपलब्ध झालेल्या संशोधन सामग्रीचे सेघटन विश्लेषण आणि अर्थनिर्वचन केलेले आहे. या विश्लेषणावर आणि अर्थनिर्वचनावर आधारित निष्कर्ष आणि शिफारशी यासाठी पुढील प्रकरणाकडे वळू या.